# बृहन्महाराष्ट्र वृत्त

On the web: www.bmmonline.org

उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक

जुलै २००७

वर्ष २७,अंक ७


# सिएॅटल अधिवेशन २६०० जणांच्या उपस्थितीत थाटात साजरे
# २००९ सालचे अधिवेशन फिलाडेल्फियात

## अध्यक्षीय

नमस्कार बंधू-भगिनींनो,



सिएॅटल येथे झालेल्या बृ. मंडळाच्या सदस्यांच्या बैठकीत मी व माझे सहकारी यांना बहुमताने निवडून दिल्याबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार!

सिएॅटल येथील अधिवेशन सुमारे २६०० जणांच्या उपस्थितीत उत्तमपणे पार पडले व त्याचे श्रेय सिएॅटल मंडळाचे पदाधिकारी, प्रमुख संयोजक जयंत भोपटकर व डॉ. राज आंगोळकर आणि त्यांचे असंख्य कार्यकर्ते, तसेच बृ. मंडळाचे माजी अध्यक्ष जगदीश वासुदेव व त्यांची कार्यकारिणी यांना आहे. त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार!

बृ. मंडळाचा अकरावा अध्यक्ष या नात्याने पुढील दोन वर्षांसाठी आम्ही ठरवलेली उद्दीष्टे आपल्यासमोर मांडताना मला अतिशय आनंद होत आहे.

१. महाराष्ट्र मंडळांबरोबरील विचारांची देवाणघेवाण आणि संबंध अधिक बळकट करणे. सध्या एकूण ४५ मंडळांपैकी ३६ सभासद मंडळे आहेत. दोन वर्षात ती संख्या १०० टक्क्यावर नेणे.

२. राष्ट्रीय स्तरावर बालविहार कार्यक्रमाची (मराठी शाळा, अभ्यासक्रम, आणि पाठ्यपुस्तके) अंमलबजावणी करणे.

३. नविन स्थानिक मंडळांना सर्वतोपरी मार्गदर्शन करणे. तसेच मंडळांना non profit status मिळण्यास मदत करणे.

४. मराठी युवकांस विशेष प्रोत्साहन देऊन त्यांच्यातील कलागुणांना वाव देणे (MAIYTRA Talent Transfer). तसेच एकांकिका व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणे.

५. उत्तर अमेरिकेतील वयोवृद्धांसाठी कम्युनिटी सेंटर्स किंवा सीनियर सेंटर्स उभारण्याच्या प्रक्रियेस चालना देणे.

६. महाराष्ट्रातील सेवाभावी संस्थांशी सहकार्य करून तेथे स्थायिक असलेल्या पालकांसाठी आणि इतर गरजू नातेवाईकांच्या देखभालीसाठी यंत्रणा निर्माण करण्यास हातभार लावणे.

७. उत्तर अमेरिकेतील मराठी उद्योजक आणि महाराष्ट्रातील उद्योजक व संस्था यांच्यातील वैचारिक आणि व्यावसायिक समन्वय साधण्यासाठी कायमस्वरूपी व्यासपीठ (Business Forum) प्रस्थापित करणे.

८. पुढील पाच वर्षामधे देणगीदारांच्या ठेवीतून एक दशलक्ष डॉलर्सचा कायम स्वरूपाचा निधी (Endowment Fund) उभा करणे. या निधीच्या व्याजातून बृ. मंडळाच्या वार्षिक ऑपरेटिंग बजेटची तरतूद होऊ शकेल.

९. फिलाडेल्फिया मंडळाबरोबर उत्तम सहकार्य करून व सलोख्याचे संबंध ठेवून २००९ साली अधिवेशनाचे रौप्यमहोत्सवी वर्ष थाटात साजरे करणे.

अशा या धाडसी आणि आवाहनात्मक उपक्रमांना आपण उत्स्फूर्तपणे आणि सक्रीय हातभार लावाल अशी मला खात्री वाटते. आपले विचार व प्रतिक्रिया जरूर कळवाव्यात. आम्ही उत्सुक आहोत.

कळावे, लोभ आहेच, वृद्धींगत व्हावा ही विनंती,


**गिरीश ठकार,**
अध्यक्ष, बृ. मंडळ
*gsthakar@gmail.com*


## या अंकात ......


| | |
|---|---|
| अधिवेशनाबद्दल प्रतिक्रीया | पान २ |
| वाचकांचा पत्रव्यवहार | पान २ |
| राजश्री करंदीकर | पान ३ |
| अधिवेशनाची क्षणचित्रे | पान ४ व ५ |
| अधिवेशनात प्रकाशित झालेली मासिके | पान ६ |
| अधिवेशनातील बृ. मंडळाचे मानकरी | पान ६ |
| उत्तररंग | पान ७ |

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र

(स्थापना शिकागो १९८१)

**संस्थापक**

कै. विष्णु वैद्य, कै.शरद गोडबोले, जयश्री हुपरीकर

**संपादक**

मोहन रानडे

**बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय**

1-800-300-6430 (EST)

E-mail: editorbmm@yahoo.com

**मुद्रक आणि वितरक**

दिलीप नामजोशी,

Sir Speedy Printing, Blue Bell, PA

वर्गणीचे दर

| | US | Canada | Other |
|---|---|---|---|
| वार्षिक – | $ 21 | $ 31 | $ 41 |
| द्वैवार्षिक – | $ 40 | $ 60 | $ 80 |
| आजीव – | $250 | $375 | $375 |

जाहिरातीचे दर

| | US | Can |
|---|---|---|
| पूर्ण पान | $155 | $220 |
| अर्धे पान | $ 85 | $115 |
| पाव पान | $ 50 | $ 70 |
| अष्टमांश पान | $ 35 | $ |

- वृत्त दर महिन्यास प्रसिध्द होते
- प्रसिध्द झालेल्या मजकुराशी संपादक मंडळ सहमत असतेच असे नाही
- लिखाणाच्या निवडीचे आणि बदलाचे अंतीम अधिकार संपादक मंडळाकडे राहतील
- पाठवलेल्या साहित्याची पोच ई–मेल कळविल्यास दिली जाईल

**बृहन्महाराष्ट्रमंडळाची कार्यकारिणी**

(२००७–२००९)

अध्यक्ष: गिरीष ठकार – पिट्सबर्ग, पेनसिल्व्हेनिया

कार्यवाह: संदीप देवकुळे – सॅन होजे, कॅलिफोर्निया

कोषाध्यक्ष: आशिष चौघुले – होकेसिन, डेलावेअर

सभासद : किरण जोगळेकर, फिलाडेल्फिया,

किशोर पाठारे, ओरलॅंडो, फ्लोरिडा

ललित महाडेश्वर, रॅले, नॉर्थ कॅरोलायना

रिटा फ्रेंचमन, नॅशव्हिल, टेनेसी

लीना देवधरे – टोरांटो, कॅनडा

माजी अध्यक्ष : जगदीश वासुदेव, प्रिन्सटन, न्यू जर्सी

सल्लागार

श्री ठाणेदार, सेंट लुईस, विद्या हर्डीकर, लॉस एंजेलिस,

MAIYTRA: मैत्र प्रतिनिधी:

नितिन सालकडे – फिलाडेलफिया

**प्रकाशक:**

बृहन्महाराष्ट्रमंडळ, उत्तर अमेरिका

196 Bryna Lane, Carnegie, PA 15106

gsthakar@gmail.com

www.bmmonline.org


# अधिवेशनाबद्दल प्रतिक्रिया

I really enjoyed the convention. It was well organized, the programs were excellent, the food as well as food service was superb, and overall convention quality was superior.

Sadanand Joshi, Oklahoma
*SJoshi@JoshiTech.com*

I cannot over state how much we all enjoyed this convention. I heard from so many people that this was the best convention they attended. The programs were excellent, the venue was great and the arrangements were outstanding.

At the personal level you all made our stay so enjoyable. (Almost to the point of making us guilty.) The sofas were great and made us very comfortable. I will admit that I had a few cat-naps during couple of programs. Our suite at Grand Hyatt was outstanding.

Please tell all your friends and the volunteers that their hard work and efforts are well appreciated. You all were well organized, very systematic and very creative. Food was excellent and plenty. Lines were short and moving. The diagonal serving lines were quite creative. A flower vase on each table was a great touch. I can go on and on for all the things that were done with heart poured in it.

This Seattle convention will be a standard to follow for years to come and will be a tough one to beat.

Subhash Gaitonde,
*subash@cmcrealty.com*

Indeed it was a very well organized event-the best I have seen in these last 9 years with Zee TV. The credit goes to the President of BMM Jagdish Vasudev and their entire team. Heartiest congratulations to you all.

Col.Harwinder Bindra (Retd)
ZEE TV USA, INC. Arlington TX

It was nice meeting all in Seattle. It was our first BMM Convention and gave me an idea how huge undertaking it is. My hats off to all people (from BMM) who organize it for the last 25 years. It is amazing.

Subhash Phatak, Portland, OR
*subhashp@yahoo.com*

अधिवेशनाबद्दल आपले विचार कळवा, संपादक, *vinata@gmail.com*

# कळावे लोभ असावा...

जून महिन्यातील 'शेवटचे पान' खूप आवडले. पुण्यातील उन्हाळ्याच्या सुट्टीबद्दलचे वर्णन माझ्या मामांकडील अनुभवांशी तंतोतंत जुळले. मराठी लोकांच्या अमेरिकेतील सुट्टीवरील भाष्यसुद्धा एकदम पटले. सततच्या चांगल्या लेखांमुळे 'शेवटच्या पाना'ची नेहमी वाट पहातो.

दिलिप फडणीस, न्यू जर्सी DPhadnis@att.net

उन्हाळ्याच्या सुट्टीवरील 'शेवटचे पान' आवडले. लेखातील प्रत्येक मुद्याशी सहमत आहे.

स्मिता देशपांडे, वायोमिसिंग, पेनसेल्व्हेनिया
smitadesh@aol.com

*जून महिन्यातील 'शेवटचे पान' आवडले. माझेच विचार वाचते आहे असे वाटले.*

*माधुरी जोशी, न्यू जर्सी* msjjoshi17@yahoo.com

**जुलै महिन्याचा अंक ८ पानी**

अधिवेशन, नविन कार्यकारिणी, नविन संपादक मंडळाची निवड या सर्व कारणांमुळे या महिन्याचा अंक फक्त ८ पानांचाच देता आला याबद्दल दिलगीर आहोत. या महिन्यात नविन संपादक मंडळाची निवड पूर्ण होऊन ऑगस्ट महिन्याचा १२ पानी अंक नेहमीप्रमाणे प्रसिद्ध होईल. वृत्ताच्या कार्यालयात बदल नसून वर्गणीचे नूतनीकरण १-८००-३००-६४३० या फोनवर करता येईल. चेक पाठविण्यासाठी पत्ता BMM Newsletter, 144 Hope Road, Holland, PA 18966. अंकासाठी साहित्य सध्या विनता कुलकर्णी vinata@gmail.com येथे पाठवावे.

# सौ. राजश्री करंदीकर: सुरेल गळयाचे मनमोकळे व्यक्तिमत्व



सुमारे आठ वर्षांपूर्वी टोरांटो (कॅनडा) येथे स्थायिक सौ. राजश्री करंदीकर गेली दोन तपाहून अधिक वर्षे संगीतकला साधनेत रममाण आहे.

राजश्रीची गायकी किराणा घराण्यातली. रहाणी अतिशय साधी. वयाच्या दहाव्या वर्षी मुंबई येथील पंडित वसंतराव कुलकर्णी यांचेकडे शास्त्रीय संगीताचे अध्ययन सुरू केले. वनस्पतीशास्त्रात मुंबई विद्यापीठातून M.A. पदवी उत्कृष्ट श्रेणीसह संपादन केलेल्या राजश्रीने जोडीला संगीताच्या अध्यापनातही आपली प्रगती कायम ठेवली. इतकेच नव्हे तर मुंबई विद्यापीठातून संगीतात M.A. परिक्षेत सर्व विद्यार्थ्यांमधून द्वितीय क्रमांक पटकावला. याच काळात राजश्रीने किराणा घराण्यातील सुप्रसिध्द गायिका डॉ. प्रभा अत्रे यांच्याकडे संगीताचे धडे घेतले. आणि त्यानंतर प्रभा अत्रेंच्या संगीत तालमीतून तयार झालेले कै. अलका जोगळेकर, पंडित यशवंतबुवा जोशी, यांच्याकडे, तसेच आकाशवाणी मुंबई केन्द्राचे त्याकाळचे सुगम संगीत विभाग प्रमुख श्री प्रभाकर पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली संगीताचे बहुमूल्य शिक्षण घेतले. सध्या मिसिसागा, टोरांटो येथे *'Rageshree School of Music'* चालवीत असून उत्तर हिंदुस्थानी शास्त्रीय व उपशास्त्रीय संगीताचे मोलाचे अध्यापन कार्य करीत आहे.

कॅनडात स्थायिक होण्यापूर्वी राजश्रीने भारतात व मध्य पूर्व देशांत व अलिकडच्या काळात कॅनडा व अमेरिकेत संगीताचे अनेक कार्यक्रम केले आहेत. तसेच अनेक सामाजिक व सांस्कृतिक संस्थांद्वारे शास्त्रीय, उपशास्त्रीय व हलक्याफुलक्या गीतांचे कार्यक्रम / कॉन्सर्टस गाजविल्या आहेत. त्यापैकी काही प्रतिथयश संस्था :

Canada:
- *Hindu Society of Ottawa & Carlton, Ottawa, ON*
- *Kala Magazine Group, Toronto, ON*
- *Kala Manjiri Group, London, ON,*
- *Living Arts Centre, Mississauga, ON,*
- *Marathi Bhashik Mandal, Toronto,ON*
- *Royal Ontario Museum, Toronto, ON*
- *Sampradaya Dance Creations, Toronto, ON.*
- *South Asian Heritage Foundation Toronto, ON*

U.S.:
- *BMM/Marathi Vishwa,, NJ*
- *BMM/Philadelphia Marathi Mandal, Philadelphia*
- *Boston Marathi Mandal, Boston, MT*

यापुढेही सातत्याने आपल्या गाण्यांचे कार्यक्रम संगीतप्रेमी रसिकांपुढे सादर करण्याचा, तसेच संगीताचे अध्यापन कार्य, व कॅनडात वाढलेल्या नव्या पिढीत हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताची गोडी निर्माण होईल यादृष्टीने प्रयत्न करण्याचा राजश्रीचा मानस आहे.

राजश्रीच्याा संगीत-क्षेत्रातील यशस्वी वाटचालीत पती श्री मिलिंद करंदीकर यांचाही मोलाचा वाटा आहे. राजश्रीच्या अनेक संगीत कार्यक्रमांत मिलिंद तबल्याची दमदार साथ करतात. संगीताचा वारसा त्यांच्या मुलांनाही लाभला आहे. मुलांच्या सांस्कृतिक कार्यक्रमात, करंदीकरांचा थोरला मुलगा चि. गंधार सफाईदारपणे *'कीबोर्ड'* वर गाण्यांना साथ देतो, तर धाकटा मुलगा चि. अथर्व याच्या गायनाने श्रोत्यांना भविष्यातील उत्कृष्ट गायकाची चुणुक दिसते. सूर, लय व ताल यामधे करंदीकर कुटुंब तल्लीन होऊन गेलंय. अलिकडेच राजश्रीची गाण्याची मैफिल ऐकण्याचा योग आला आणि म्हणावेसे वाटले -

" सप्तसुरांचा स्वर्ग उभारुन, चराचरांना दे संजीवन " ।
हे रागेश्वरी, असेच "अमृत संगीत" गा, राजश्री गात रहा ॥

**- डॉ. विनता कुलकर्णी**
*vinata@gmail.com*

SAVE DISABLED CHILDREN THRU FREE PLASTIC SURGERY





PLEASE DONATE GENEROUSLY TO DR. DICKSHEET'S INDIA PROJECT
WWW.DRDICKSHEET.ORG

135 OCEAN PARKWAY 17C
BROOKLYN, NY 11218
PH. 718 633 1449 or 727 868 1667
E mail: murphy.pianoman@att.net
*YOUR DONATION OF $150 CAN SAVE ONE CHILD*





# सिऍटल अधिवेशनातील क्षणचित्रे



डॉ. नरेंद्र जाधव, श्री. विलासराव देशमुख, डॉ. जब्बार पटेल,
जगदीश वासुदेव



अष्टनायिका - सॅन होजेचे कलाकार



मुलांच्या
कार्यक्रमातील
दोन दृष्ये



उदघाटनाचा
कार्यक्रम



ऐलतीर@पैलतीर - थिऍट्रिक्स, न्यू जर्सी



नाटक -
हे राम
कार्डिओग्राम









स्त्री रंग
अश्विनी भिडे, झेलम परांजपे व विजया राजाध्यक्ष

मम आत्मा गमला -
नीलाक्षी पेंढारकर, आशा खाडिलकर, सुरेश बापट
सचिन व सुप्रिया
रवींद्र साठे व सिऍटलचे कलाकार



# सिएॅटल अधिवेशनातील क्षणचित्रे



प्रकाश व मंदा आमटे यांची सुधीर गाडगीळ मुलाखत घेताना



पुस्तकाच्या स्टॉलवरील गर्दी

समारोपाचा कार्यक्रम 'सूर पश्चिमेचे'





शाम काणे, उस्ताद झाकिर हुसेन, कला रामनाथ

सिएॅटल अधिवेशनातील स्वयंसेवक





फिलाडेल्फियाचे प्रतिनिधी २००९ सालच्या अधिवेशनाचा नारळ स्विकारताना

बृहन्महाराष्ट्र मंडळाची नविन कार्यकारिणी - डावीकडून विद्या हर्डीकर, श्री ठाणेदार (सल्लागार मंडळ), आशिष चॉघुले, गिरीश ठकार, किशोर पाठारे, संदीप देवकुळे, रिटा फ्रेंचमन, किरण जोगळेकर, लीना देवधरे, ललित महाडेश्वर, नितिन सालकडे



## अधिवेशनातील बृ. मंडळाचे मानकरी



**Priyanka Tope (Youth Talent)**
Outstanding talent in vocal music and utilizing it for helping social causes.



**Dr. Sada Joshi (Technology)**
Outstanding contribution and pioneering research in the development of horizontal oil well drilling technology that revolutionized oil and gas production.

**Dr. Pramod Chemburkar (Social Work)**
A social worker making significant monetary contributions to several charitable organizations in India and USA.

**Dr. Hemant Marathe (Community Work)**
His contribution and consistent involvement in Marathi Vishwa of New Jersey and American community of Princeton.



**Dr. Shyamala Chitale (Science)**
Outstanding long time contribution and dedicated research in the field of Paleobotany, study of ancient plants.



**Ramesh and Seema Lokre (Business)**
Outstanding achievement as entrepreneurs, founding and heading a fastest growing organization, Saicon Consultants Inc.



**Sunil Narkar (Arts)**
To promote Marathi theater and art in North America.

**Maayboli (Organization or Company)**
A comprehensive Marathi portal, to recognize and honor its services for the Marathi community in North America and Maharashtra.

### *Shri Thanedar wins Entrepreneur of the Year Award*

July 6, 2007, 2007, St. Louis, MO : Shri Thanedar, Ph.D. has been selected as the winner of the Ernst & Young Entrepreneur of the Year 2007 in the Central Midwest Region. Thanedar was recognized as the award recipient in the technology division by a panel of area leaders from business, academic and civic organizations. As a regional recipient, he will be eligible for the Ernst & Young Entrepreneur of the Year 2007 national program, to be announced in November 2007. Congratulations to Shri Thanedar!

## पुस्तक परिचय




अधिवेशनाच्या निमित्ताने मासिकाचा 'अधिवेशन विशेषांक' काढण्याची प्रथा अनेक वर्षे चालू आहे. हे वर्षही त्याला अपवाद नव्हते. श्री दीपलक्ष्मी व वसंत या दोन मासिकांचे खास अंक सिएॅटल अधिवेशनात प्रकाशित झाले. टोरांटोचे डॉ. विजय ढवळे यांनी श्री दीपलक्ष्मी अंक संपादित केला असून त्यामधे जगदीश वासुदेव, भारती घोलकर, अनिल देशपांडे, डॉ. गंगाधर मद्दीवार, सुधीर मोरावेकर, किशोर रानडे, किशोर गोरे, डॉ. अनंत लाभसेटवार, रमेश व गीता घाणेकर, विद्या हर्डीकर सप्रे, मॅक्सीम नुबी व डॉ. विजय ढवळे यांचे परिचय आहेत. डॉ. नरेंद्र जाधव, सचिन व सुप्रिया पिळगांवकर, सोनाली कुलकर्णी, व झाकिर हुसेन यांचे परिचय महाराष्ट्रातील लेखकांनी लिहिले आहेत.




वसंत मासिक टोलिडोचे डॉ. अनंत लाभसेटवार यांनी संपादित केले असून त्यामधे नीलिमा कुलकर्णी, वीणा शहा, जया हुपरीकर, विद्या हर्डीकर सप्रे, वसंत कुंभोजकर, अरूण जतकर यांच्या कथा, माधुरी बापट, डॉ. विजय ढवळे, डॉ. अनंत लाभसेटवार, प्रकाश वाघमारे, जयंत चित्ते, प्रभाकर कुलकर्णी, यशवंत पत्की यांचे लेख तर ललिता गंडभीर,प्रकाश लोथे, व डॉ. रवींद्र गोडसे यांच्या ललित लेखांचा समावेश आहे.

बृहन्महाराष्ट्र वृत्त
जाहिरातीसाठी उत्तम माध्यम,माफक दर

**COMFORT TRAVEL**
ARC **EDISON, NJ** IATA

**Alaska cruise & tour group leaving for 7 nights before & after BMM Convention**
**SOTC tours/Cox & Kings to Europe**
**eMail: comforttrvl@netscape.net or comforttrvl@yahoo.com**
**Please call - SHAILA SHIRVALKAR**
**TEL: 732-767-3135**
**FAX: 732-767-3138**

# उत्तर रंग

## Report on "SUCCESSFUL AGING" Seminar at the 13th BMM Convention, Seattle, WA, June 30, 2007.

An enthusiastic crowd of over 40 people attended the Seminar in spite many competing entertainment programs in the same time slot. Presentations given by Meena and Avinash Deshpande, Ashok and Manisha Gore and Vidya Sapre were well received and generated many questions and discussions. Jagdish Vasudev gave an overview at the beginning. Ashok Sapre facilitated the session. Many people in audience expressed their interest in getting involved in future activities related to seniors.

The following interesting review was distributed at the Seminar:

**Marathi Community Is Preparing for *Successful Aging***
**Milestones (1981-July 2007)**

Seminar on Retirement Planning in almost every **BMM Convention since 1983**.

Introduction of an idea to "build" a retirement community for Indo-American seniors, **1991 BMM Convention**, Long Beach, CA.

Monthly **Uttar Rang** Column started in January 2004 in the **BMM Vrutta** to discuss the issues in senior years.

**First Two-Day National Conference** on "Issues, Aspirations and Options in Senior Years for Indo-Americans", in Los Angeles, CA in **Feb 2005**, organized by **MyHeritage.**

**55plus Club was established** in NJ/NY/PA area, **Sept 2005**.

**Second Two-Day Conference**, "Successful Aging", in New Jersey, July 2006, organized jointly by **New Americans of NJ, Inc, 55 plus Club and MyHeritage.**

Seminar on "**Successful Aging**" at the BMM Convention in Seattle, WA, June 30, 2006, organized jointly by **55 plus Club, MyHeritage and New Americans of NJ, Inc,**

In addition, informal groups have been established in many cities in North America.
***Please,*** add missing items and e-mail them to: ashok.sapre@verizon.net

*Thank You!*
*The Journey Continues...................* *6/30/2007*


**पूर्वीच्या अधिवेशनातील कार्यक्रमांच्या डीव्हीडी**
**ॲटलांटा**

*डॉ. माशेळकर यांचे भाषण - १० डॉलर्स ,*
*उद्‌घाटनाचा कार्यक्रम - १२ डॉलर्स, वेस्टर्न घाटस - १२ डॉलर्स*
*हृषिकेश रानडे, बेला शेंडे - सुगम संगीत - १२ डॉलर्स*
*शिपिंग ३.५० डॉलर्स ऑर्डर करण्यास १-८००-३००-६४३० फोन करा*



तुम्ही घर घ्यायचं
आणि निर्धास्त व्हायचं.

मायदेशात घर घेताना तुमच्या डोळ्यासमोर असलेली असंख्य स्वप्नं, कुठल्याही काळजीचं ग्रहण न लागता पुरी होणारच याची आता खात्री बाळगा. अगदी घराच्या निवडीपासून देखभालीपर्यंत प्रत्येक टप्प्यावर आम्ही तुमच्या साथीला आहोत. उत्तमोत्तम डीएसके प्रकल्पातून मनाजोगतं घर निवडायला तुम्हाला योग्य मार्गदर्शन तर मिळेलच. शिवाय तुम्ही नसताना तुमच्या घराची संपूर्ण देखभाल आम्ही करू. भाड्याने द्यायची किंवा पुन्हा विकायची इच्छा असेल तर मदत आणि नियमितपणे कर भरण्याची व्यवस्थाही करू. तेव्हा तुमच्या सर्व चिंता काळज्यांचं ओझं आमच्यावर सोपवा आणि निर्धास्तपणे आनंद लुटायला सज्ज व्हा !

सर्वोत्तम लोकेशन्स, सर्वगुणसंपन्न घरं
• डीएसके **गार्डन एन्क्लेव्ह**, कोंढवा, पुणे • डीएसके **सुंदरबन**, हडपसर, पुणे • डीएसके **फ्रँजिपनी**, कँप, पुणे

DSK
घराला घरपण देणारी माणसं®

डी.एस.कुलकर्णी डेव्हलपर्स लि.
AN ISO-9001, 14001, OHSAS 18001 COMPANY
डीएसके हाऊस, जंगली महाराज रोड, शिवाजीनगर, पुणे 411 005. फोन : **6604 7100** टेलि-इन्फोसाठी : **020 - 6604 7181**
१४, उपासना, एल जे रोड, सेनाभवन जवळ, शिवाजी पार्क, मुंबई 400 016. फोन : **022 - 2432 4328**
• **E-mail:** sales@dskdl.com • **Web Site:** www.dskdl.com
pratisaad.com 06/772

बृहन्महाराष्ट्र वृत्त

Subscription Remittance Address
BMM Newsletter
144 Hope Road,
Holland, PA 18966-5408
*Or call 1-800-300-6430 to pay by credit card. Master Card, Visa, American Express and Discover is accepted.*


**INSURANCE & REAL ESTATE**

**HEALTH INSURANCE FOR VISITORS FROM ABROAD**
Reasonable Rates. Administering this program for more than 15 years.

**LIFE INSURANCE**
Lowest rates in USA. Reputable carriers

**REAL ESTATE**
Hotels/Motels, Businesses

**Administering this program for more than 25 years**

**Contact: Shashi Thakur, Ph.D.**
Tel: (901)854-9451 Fax : (901)853-4809
Cell: (901)230-3209
E-mail: sjthakur@bellsouth.net

**HEALTH INSURANCE**

**INDIVIDUAL & GROUP HEALTH INSURANCE FOR**

*** VISITORS**
*** H-1 B VISA HOLDERS**
*** PERMANENT RESIDENTS**
**( Some restrictions apply)**

**For more information:**
**Contact: Padmaja Bapat**
**Independent Insurance Agent**
**616 Rhodes Hill Court**
**Martinez, GA 30907**

Tel: (800)204-1939
Fax : (706)860-7268
E-mail: padmajabapat@yahoo.com
Website: visitors-insurance.com